Arunodaya Dnyan Prasarak Mandal's

**Women's College of Arts, Commerce and Home Science Jalgaon**

## <u>One Day Workshop on Human Rights and Present Scenario</u>
## Report

ADPM's Women's College of Arts, Commerce and Home Science, Jalgaon has organized one day workshop on Human Rights and Present Scenario on 11 December, 2017. We celebrate World Human Rights Day on 10 December every year. The present workshop was a part of this celebration. The scholars on human rights and the activists involved in human rights were invited as chief guests and speakers in this workshop. Renowned activist Dr. C. P. Labhane inaugurated the workshop. Hon. Pratibhatai Shinde, General Secretary Loksangharsha Morcha, Maharastra was the keynote speaker. Hon. A. F. Bhalerao, vice-president Human Rights Commission, Mr. Abdul Rauf Janab a Social activist, Prof. Devendra Ingle a scholar of Human Rights, Hon. Mukundbhau Sapkale an activist and Prof. A. P. Chaudhari famous writer were present for the workshop.

In her keynote speech Hon. Patibhatai Shinde analysed the present socio-political constrictions and the status of Human Rights. She stated that she was worried about the present denial of human rights. She also appealed that everyone should be aware about his/her rights. Prof. A. P. Chaudhari also appealed to the participant to continue to fight against injustices and inequality.

In the first session Mr. Abdul Janab outlined the present scenario regarding human rights. Hon. A. F. Bhalerao was the chairperson of the session. Prof. Devendra Ingle in his speech on 'Human Rights: Issues and problems' attacked on the present scenario of human rights.

Principal Dr. Jayashri Nemade chaired the session.

WOMEN'S COLLEGE OF ATR'S. COM. & HOME SCI. JALGAON R-NAAC Accredited

Principal
A.D.P.M's Women's College of Art's, Com. & Home Sci. Jalgaon

The workshop concluded with the valedictory address of Hon. Mukundbhau Sapkale. He discussed the present issues of human rights with the participants. All the teaching and non-teaching staff members and About 120 teachers and students from all over the state were participated in the workshop.

WOMEN'S COLLEGE OF ATR'S. COM. & HOME SCI. JALGAON
R-NAAC Accrediated

Principal
A.D.P.M's Women's College of Art's, Com. & Home Sci. Jalgaon

ic School :
Public School
ovative teaching
ies in the school
rictly following
im. AHPS is a
st learned and
r checking so
s and they find
ce where their
with knowledge
successful life.

on lays the
career and the
ing this fact in
lated the best
SE pattern of
nd dedicated
evote their time
it and progress
ng itself as one
HPS strives to
t is intended to
ssful life in the

i S. Khan
pal
y School &
Public School

ुमाई

2017-18 (1)

# मानवाधिकार आणि सद्यःस्थिती या विषयावर एकदिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळा

१० डिसेंबर हा जागतिक मानव अधिकार दिवस. या दिनाचे औचित्य साधून दि. ११ डिसेंबर २०१७ रोजी आपल्या महाविद्यालयामध्ये 'मानव अधिकार आणि सद्यःस्थिती' या विषयावर एक दिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी मानव अधिकारावर विशेषत्वाने अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांबरोबरच मानव अधिकारासाठी रस्त्यावरची लढाई लढणाऱ्या मान्यवर कार्यकर्त्यांना प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. त्यामध्ये उद्घाटक म्हणून नामांकित प्राध्यापक व कार्यकर्ते डॉ. सी.पी. लभाणे, बीजभाषक म्हणून लोकसंघर्ष मोर्चाच्या जनरल सेक्रेटरी मा. प्रतिभाताई शिंदे, मानव अधिकार आयोगाचे उपाध्यक्ष मा. अ.फ. भालेराव, सामाजिक कार्यकर्ते अब्दुल रऊफ जनाब, मानव अधिकाराचे अभ्यासक मा.प्रा. देवेंद्र इंगळे, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते मा. मुकुंदभाऊ सपकाळे व संस्थेचे मानद सचिव व सुप्रसिद्ध लेखक मा.प्रा. अे.पी. चौधरी इत्यादी मान्यवरांचा समावेश होता.

सकाळी ९.३० ते १०.३० यावेळेत नाव नोंदणी व नाश्त्यानंतर मा.प्रा.डॉ. सी.पी. लभाणे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थान संस्थेचे मानद सचिव मा.प्रा. अे.पी. चौधरी यांनी भूषविले होते. उद्घाटकीय मनोगतानंतर मा. प्रतिभाताई शिंदे यांनी बीजभाषण केले. त्यामध्ये त्यांनी वर्तमानकाळात होत असलेल्या मानव अधिकाराच्या हननाबाबत चिंता व्यक्त करून ते थांबविण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. अध्यक्षीय समारोपात मा.प्रा. अे.पी. चौधरी सरांनी प्रतिभाताईंच्या भाषणाने आपण भारावून गेल्याचे सांगून आपण सर्वांनी मिळून मानव अधिकाराची लढाई लढली पाहिजे असे सांगितले.

उद्घाटनानंतरचे सत्र 'मानव अधिकार आणि अल्पसंख्यांक' या विषयावर होते. मा. अब्दुल रऊफ जनाब यांनी वर्तमान संदर्भ लक्षात घेऊन या विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी केली. या सत्राचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्य मानव अधिकार आयोगाचे उपाध्यक्ष मा. अ.फ. भालेराव यांनी भूषविले होते. दुसऱ्या सत्राचा मुख्य विषय 'मानव अधिकार समस्या आणि आव्हाने' हा होता. प्रा. देवेंद्र इंगळेंच्या अभ्यासपूर्ण व चिकित्सक विवेचनाने संपूर्ण सभागृह विचारप्रवर्तक झाले होते. या सत्राचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्री नेमाडे यांनी भूषविले होते.

या कार्यशाळेचा समारोप आंबेडकरी चळवळीचे सुप्रसिद्ध कार्यकर्ते मा. मुकुंदभाऊ सपकाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. समारोपाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्री नेमाडे यांनी भूषविले होते. प्रत्येक सत्रानंतरच्या प्रश्नोत्तराने कार्यशाळेची उंची अधिकच वाढली होती. राज्यभरातील १२० प्राध्यापकांचा व विद्यार्थ्यांचा लक्षणीय सहभाग ही या कार्यशाळेचा आणखी एक विशेष.



NAAC Accredited
Principal
K.C.E.S.'s Women's College of Arts, Com. & Home Sci. Jalgaon

नीटनेटक्या आयोजनाबरोबरच सर्वात कमी नोंदणी फी असूनही रुचकर व स्वादिष्ट जेवण व अभ्यासू व कृतीशील अशा प्रमुख मान्यवरांची उपस्थिती अशा सुरेख संगमामुळे सहभागी प्राध्यापकांनी उत्स्फूर्त पसंतीची मोहोर उमटवली नसती तरच नवल. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्री नेमाडे व उपप्राचार्य डॉ. किशोर नेहेते यांचे उत्कृष्ट संचालन, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनींबरोबर डॉ. प्रकाश कांबळे यांचा असलेला उत्तम समन्वय यामुळे ही कार्यशाळा केवळ यशस्वीच ठरली नाही तर एकूणच कार्यशाळा व सेमीनार्ससाठी मानदंड ठरली. सर्व प्रसार माध्यमांनीही या कार्यशाळेला सर्वदूर प्रसिद्धीही दिली. प्रशांत पब्लिकेशन्स आणि भंगाळे गोल्ड यांच्या सहकार्यामुळे या ज्वलंत विषयावरील ही कार्यशाळा यशस्वीपणे घेता आली याचा महाविद्यालय परिवाराला अधिक आनंद आहे.

OOO

Principal
A.D.P.M's Women's College of
Art's, Com. & Home Sci. Jalgaon